ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 3 | NOVEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# इतिहास संशोधन आणि अहमदनगरचे ऐतिहासिक वस्तु संग्रहालय [सन १९६० ते २०१६]

**प्रा. संतोष यादव**
**संशोधक विदयार्थी [विद्यावाचस्पती] , टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.**

## प्रस्तावना :

**भग्न तरीही अंभंग हे अवशेष**
**काळाच्या कराळ दाढेतून बचावलेले**
**पराभव पचवणारे पराक्रम पाजळणारे**
**दुरीतांचे तिमिर जाळणार अन**
**उजाळणारे विश्वस्वधर्म**
**इतिहासाचा हा थोर वारसा**
**आरसा हा मृत्युंजय संस्कृतिचा.**




असे म्हणतात इतिहास घडवणारे कधी इतिहास लिहीत नाहीत आणि जे इतिहास लिहीतात, त्यांचा स्वतःचा कधीच तो नसतो. आम्ही असेच ऐकत आलोत. पण गेली पन्नास वर्षे इतिहास संशोधकाना दिशा देण्याचे काम नगरच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाने अविरतपणे केले आहे. आज महाराष्ट्राची नव्हे तर देशाची वेगळी ओळख हे संग्रहालय निर्माण करत आहे. यावर टाकलेला एक प्रकाश .

## पूर्वइतिहास :

अहमदनगरमध्ये सन १९२५-३० ला वाड्मय इतिहास मंडळाची स्थापना कै. सरदार बाबासाहेब मिरीकर, मुन्शी उन्मीद, नगरवाला कुटूंबीय अशा अनेक इतिहास अभ्यासकांनी केली. सुरवात फक्त इतिहासाची आवड आणि घरची जुन कागदपत्रे यांची होती. त्याची चर्चा ही होती. पण पहाता पहाता अनेक दस्तऐवज यांकडे जमा झाली. आणि यातून अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाची संकल्पना समोर आली. आजचे जे हातमपूरा याठिकाणी सणारे संग्रहालय आहे. १ मे १९६० साली झाली. पुर्वीच्या नगरपालिकेच्या दोन खोल्यात या वास्तूची स्थापना झाली. सन १९६५-७० मध्ये सध्याच्या हातमपुरा भागात कलेक्टर कम्पाऊंडच्या आवारात या संग्रहालयाची जोमाने पायाभरणी झाली आणि इवल्याशा लावलेल्या रोपटयाचा मोठा वटवृक्ष केव्हा झाला ते समजलच नाही.

## संग्रहालयाची स्थापना :

१ मे १९६० साली या वास्तूची स्थापना झाली. कै. सरदार मिरीकरांनी यासाठी खुप परिश्रम घेतले. मंत्रालय स्तरापर्यंत पत्रव्यवहार केला. त्यांना साथ नवनीतभाई बार्शीकर, फिरोदिया कुटूंबीय, नगरवाला परिवार, दादा जोशी अशा अनेक मातब्बर मंडळींची साथ मिळाली. सन १९७५ पासून या कामात कै. सुरेश जोशी नावाचा तरुण सामील झाला. आणि संग्रहालयाच्या दुसऱ्या पर्वास सुरुवात झाली. स्वतः एम ए आर्किलॉजी विषयात प्राविण्य मिळवलेले सुरेश जोशी यांनी संपूर्ण जीवन याकामी वाहून घेतले. ज्या ज्या ठिकाणी ऐतिहासिक वस्तू, दस्तऐवज आहेत त्यांच्या ते भेटी घेवू लागले. पाहता पाहता अनेक वस्तू या संग्रहालयात जमा झाल्या. लोकांनी अनेक वस्तू स्वतःहून दिल्या. काही अनेकांच्या माध्यमातून मिळाल्या. कलेक्टर लखीना साहेब, जितकर साहेब, प्रसिध्द सिने अभिनेते कै. सदाशिवराव अमरापूरकर यांनी या संग्रहालयाच्या जडणघडणीत विशेष लक्ष घातले आणि आजचे वस्तू संग्रहालय ही भव्य वास्तू उभी राहीली.

**वस्तू संग्रहालयाचे विशेष विभाग :**

अहमदनगरच्या वस्तू संग्रहालयाचे आजही पंधराहून अधिक विभाग आहेत, ज्यात नगर दर्शन, पोथी लघुचित्र, मूर्तीशास्त्र विभाग, दुर्मिळ वस्तू विभाग, मध्यकालीन चित्रकला विभाग, अर्वाचीन विभाग, प्रिटींग प्रेस विभाग, शस्त्रास्त्रे विभाग, सैनिकांचा पोशाख, नाणीसंग्रह, पगडया विभाग, नकाशे विभाग, जुने दस्तऐवज विभाग, अर्वाचीन विभागात अनेक दुर्मिळ नामशेष होत असलेल्या वस्तूंचा संग्रह करण्यात आला आहे. ग्रंथालय विभागात प्राचीन, मध्यकालीन, अर्वाचीन विभागातील चार ते पाच हजारांवर ग्रंथांचे संकलन केले आहे. जे आजही इतिहासाची साक्ष देत आहेत, अनेक अभ्यासक घडवत आहेत.

**संग्रहालयाचे इतिहास संशोधनात योगदान :**

कै. सरदार मिरीकर, कै. सुरेश जोशी यांनी विशेष करुन नगरच्या नेवासा, जोर्वे याठिकाणी झालेल्या उत्खननात, डेक्कन कॉलेजच्या सोबत राहून सहभाग नोंदवला. त्या उत्खननात सापडलेल्या अनेक वस्तू आजही संग्रहालयात जतन करुन ठेवण्यात आल्या आहेत.

संग्रहालयाने इतिहास अभ्यासकांना बरोबर घेऊन, विसहून अधिक ग्रंथ प्रकाशित केली आहेत. इतिहास संशोधन प्रदीप नावाचे त्रैमासिक संग्रहालय जवळजवळ दहा ते बारा वर्ष प्रकाशित करत होते. या संग्रहालयातील संदर्भ ग्रंथाचा आधार घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी एम फिल., पीएचडी या पदव्या मिळवल्या आहेत. नगरच्या पत्रकारितेचे नावलौकिक ब्रिटिश काळापासून आहे. दाजी भिमाजी कुकडे यांची न्याय सिंधू शिळा प्रेस मशीन, दिनमित्रकार मुकूंदजी पाटील यांचे प्रेस मशीन आजही इतिहासाची साक्ष सांगत आहे. या वर्तमानपत्राचे असंख्य अंक संग्रहालयाने जतन करुन ठेवले आहेत.

**संग्रहालयाच्या कारकिर्दीचा तिसरा टप्पा :**

संग्रहालयाने आपले अस्तित्त्व, नावलौकिक टिकवण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण २०१२ मध्ये कै. सुरेश जोशी यांचे वृध्दापकाळामुळे निधन झाले. त्याचवर्षी अभिरक्षक मोडीचे तज्ज्ञ, कै. मिलींद जोशी यांनाही देवाज्ञा झाली आणि संशोधन, अभ्यास हया सर्व गोष्टी बंद पडल्या. आधिच १९९० नंतर शासनाची मदत पण पूर्ण बंद. या खूप खडतर परिस्थितीत संग्रहालय कसे बसे उभे होते. या पडत्या काळात जिल्हाधिकारी संजीव कुमार साहेबांची तातडीची बैठक बोलावली आणि कार्यकारी विश्वस्त पदावर २०१२ मध्ये मुळचे वैद्यकिय क्षेत्रातील पण इतिहासाची प्रचंड आवड असलेले डॉ. रविंद्र साताळकर यांची निवड केली तर अभिरक्षक या पदावर संतोष यादव यांची निवड झाली.

सन २०१२ नंतर संग्रहालयातील अनेक घडामोडींचा सखोल अभ्यास करुन जिल्हाधिकारी, कार्यकारी विश्वस्त यांनी पुन्हा संग्रहालय उभे करण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्या दिशेने पावले टाकण्यास सुरवात केली. अत्याधुनिक असंख्य सोयी सुविधांनी सुसज्ज असे संग्रहालय यांच्या दुरदृष्टीमुळेच समोर आले. सन २०१३ मध्ये आर्किटेक्ट पदी अब्राहम पॅथरोस, औरंगाबाद या वास्तू तज्ज्ञाची निवड कमिटीने केली. सन २०१३-१४ मध्ये जिल्हाधिकारी पदी अनिलजी कवडे विराजमान झाले आणि संग्रहालयाने खऱ्या अर्थाने कात टाकली. मुळचे सोलापूर जिल्हयातील करमाळे तालुक्याचे जिल्हाधिकारी प्रचंड अभ्यासू आणि इतिहासाची आवड असणारे त्यांनी स्वतः सर्व गोष्टी बारकाईने समजून घेतल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती गोळा केली आणि विशेष प्रयत्नातून नाविन्यपूर्ण योजनेतून जवळजवळ तीन कोटी रुपयांना मंजूरी दिली. सन २०१४ मध्ये पालकमंत्री मा. राम शिंदे, जिल्हाधिकारी, कार्यकारी विश्वस्त यांनी संग्रहालयाच्या रिनोव्हेशनच्या कार्यास प्रारंभ केला. या कामाचे तीन टप्पे करण्यात आले आहेत. सिव्हील वर्क, इंटेरिअर, गार्डन विभाग या भागात याचे काम होणार असून, जिल्हयाची नव्हे तर राज्याची नवी ओळख तयार करण्याचे काम संग्रहालय करणार आहे. आज या कामाचा शेवटचा टप्पा चालू आहे. मे २०१७ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

**काय असतील इतिहास अभ्यासकांसाठी संग्रहालयात सोयीसुविधा :**

संग्रहालयात दुसरा मजला पुर्णपणे ग्रंथालय विभागास देण्यात आला आहे. यात स्वतंत्र संशोधकांसाठी अभ्यासिका, संदर्भ ग्रंथ विभाग, इंटरनेटची सुविधा, ई-बुक याठिकाणी एम.फिल, पीएच.डी. चे थेसीस विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. मोडी लिपीचे प्रगत वर्ग संग्रहायल शास्त्र, ट्रॅव्हल्स टुरिझम, इतिहास व्याख्यानमाला परिसंवाद पुणे विद्यापीठामार्फत शिकवले जाणार आहेत.

संग्रहालय पुन्हा त्रैमासिक ग्रंथ सुरु करण्याच्या विचाराधिन आहे. त्यासाठी प्रा. गवळी सर, मी स्वतः, इतिहास अभ्यासक भूषणजी देशमुख, न्यू आर्टस कॉलेजचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. किसनजी अंबाडे, प्रा. गफूर शेख अशा अनेक तज्ज्ञांची मदत घेऊन यांच्या मार्गदर्शनाखाली गाव वाईज इतिहास संशोधन मोहित हाती घेतली आहे. आज रोजी बराचसा इतिहास कार्यालयात संकलित झाला आहे. यातून नक्की बारा ते तेरा खंड प्रकाशित होतील अशी आशा आहे. संग्रहालयाने ग्लीमपिसेस ऑफ अहमदनगर, अहमदनगर शहराचा इतिहास, मोडी संतोष सॉप-टवेअर अशा अनेक ग्रंथाचे पुनःमुद्रण केले आहे तर सॉप-टवेअर निर्मितीतही सहभाग नोंदवला आहे.

संग्रहालय ज्येष्ठ इतिहास अभ्यासक प्रा.अशोकजी नेवासकर यांच्या इतिहास संशोधनावर आधारित लवकरच एक ग्रंथ प्रकाशित करत आहे. मोडी लिपीचे दुसरे सॉप-टवेअरही लवकरच उपलब्ध करुन दिले जाणार आहे. संग्रहालयाने नगर दर्शन नावाचा मोबाईल ॲप विकसीत केला आहे. आपण तो प्ले स्टोअरवरुन मोफत डाऊनलोड करु शकता.

**संशोधकांनी, इतिहास प्राध्यापकांनी संग्रहालयासाठी कार्य करावे :**

- जर आपण एखादे इतिहासाचे पुस्तक, संदर्भग्रंथ प्रकाशित केले असतील तर नक्कीच त्याची एक प्रत आपण कार्यालयात जमा करावी.
- जर आपल्या घराण्याच्या इतिहासा संदर्भात आपणाकडे काही मोडी, फारसी, उर्दू दस्तऐवज असतील तर नक्कीच त्याचे वाचन संग्रहालय करुन देईल.
- जर आपणाकडे काही ऐतिहासिक वस्तु असतील आणि त्या जर आपल्या कोणा व्यक्तिच्या नावे आपणास दयावयाच्या असतील तर आम्ही नक्कीच त्यांचा सुव्यवस्थित डिस्प्ले करु.
- आपणाकडे काही ऐतिहासिक विषयांवर लिखाण असेल आणि जर आपण ते प्रकाशित करु इच्छिता तर नक्कीच संग्रहालय त्याचा विचार करील.
- आपण जर संग्रहालयात आर्थिक मदत करु इच्छिता तर इन्कम टॅक्स कर सवलतीच्या अधिनियमाखाली आपली देणगी स्विकारली जाईल जेणेकरुन आपणास इन्कम टॅक्स मध्ये सवलत मिळेल.

**संदर्भसूची :**


- सरदार बाबासाहेब मिरीकर, नगर शहराचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, पृष्ठ ३, ४.
- सुरेश जोशी , इतिशोध, अहमदनगर संग्रहालय प्रकाशान पृष्ठ १४, १७, २१
- महाराष्ट्र शासन, गॅझेट अहमदनगर पृष्ठ २२, २३
- डॉ. शशी धर्माधिकारी, चाँद सुलताना, पृष्ठ २, ३
- अहमदनगर जिल्हयातील स्वातंत्र्यसंग्राम, कै. नाथ विठ्ठल पाठक, सुरेश जोशी, पृष्ठ २३,३५
- इतिहास संशोधन प्रदीप त्रैमासिक, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, पृष्ठ ६६, ७८, ७९.
- गिम्पसेस ऑफ अहमदनगर , डी.डी.आगरकर, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन पृष्ठ १२,१३
- अहमदनगर संग्रहालयाचे ओझरते दर्शन, सुरेश जोशी, अहमदनगर संग्रहालय, पृ. ४५,४६
- अस्सल नगरी, अण्णा मिरीकर, पृष्ठ ६७, ६८.
- शत सावंत्सरिक स्मारक ग्रंथ, नगरपालिका, अहमदनगर पृष्ठ १२, १३, १४.
- नगर पंचशताब्दी विशेषांक, दै. लोकमत प्रकाशन, पृष्ठ ८९,९०.
- अहमदनगर हिस्टोरिकल म्युझिअम फेसबुक पेज
- अहमदनगर एन आय सी जिल्हाधिकारी अ.नगर वेबसाईट
- नगर दर्शन ॲनड्राईड मोबाईल प्ले बुक साईड.
- रिनोव्हेशनच्या नवीन कामाचे स्लाईड शो, अहमदनगर संग्रहालय.